# SPEAK FLUENT ENGLISH
# स्पीक फ्लूएंट इंग्लिश

**लता कित्तूर**
**आशा रतनजी**

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**Speak Fluent English : स्पीक फ्लूएंट इंग्लिश**
लता कित्तूर, आशा रतनजी

**© लता कित्तूर, आशा रतनजी**
बंगला नं. ७१, एलफिस्टन रोड,
कँप बेळगाव- ५९०००१
फोन नं. (०८३१) २४२३५२५

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९६८ ९९९५ ३००

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १५०/-

# Dedication

अव्वा,

तुझ्या मोठ्या मुलासारखं (दादा–माझ्या आजोबासारखं) मलाही फाडफाड इंग्लिश बोलता यायला हवं ही तुझी इच्छा मी कधीच पूर्ण केलीय. इतरांनाही फायदा व्हावा म्हणून हा लेखनप्रपंच. पेसी अंकल आणि गुडबॉडी अंकल, केवळ तुमच्यामुळेच मी मला इंग्लिश बोलता यायला हवं हा विचार करू शकले. तिनइकर, आठवले, चित्रे बाई आणि बेतकेकर सर, मराठी शाळेमधल्या मुलींना इंग्लिश बोलता यायला हवं म्हणून प्रयत्न करणारे तुमच्यासारखे शिक्षक मला मिळाले. इंग्लिश बोलावं कसं, हे कुंदाताई बेळगावकरांनी शिकवलं. या भाग्याची मी मानकरी आहे. हे पुस्तक तयार करताना प्रचंड वेळा जाणवलं, मला इंग्लिश येतं त्यामागे सगळा रुस्तमच तर आहे. माझ्या नकळत माझ्या चुका त्यानंच तर सुधारल्या. आजही जुबीन, मेहनोश आणि झरीर ही माझी मुलं उच्चार कसा चुकला ते सांगतात पण नकळत नाही. मस्तपैकी कोलगेटची जाहिरात करतात. सुमिता मात्र तसं नाही करत. अनंत मनोहर आणि शीतल मेहता यांचं प्रोत्साहन यामुळे हा योगायोग ऑक्टोबर २००९ पासून सुरू झाला आणि तो सिलसिला चालूच राहणार याची खात्री आहे.

आजही मास्तरीण हा शब्दसुद्धा कुचेष्टेनं बरेचजण वापरतात. ३७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत गणित शिकवताना मास्तरीण म्हणवून घेतलं पण कधीच कमीपणा वाटला नाही. या पुस्तकासाठी काम करताना आम्हा दोघींनाही मास्तरीण असल्याचा अक्षरश: अभिमान वाटत राहिला. शिक्षिका होतो म्हणून तर हे सगळं नीट व्हावं यासाठी प्रयत्न करू शकलो.

लताच्या शब्दात "This work is dedicated to my grandmother, who insisted that I speak proper English & to my students who made me learn the fundamentals of English."

या पुस्तकात अमुक माझं, तमुक लताचं असं काहीही नाही. आहे ते आम्हा दोघींचे मिळून. चुका झाल्या असतील याची कल्पना आहे. पुन्हा पुन्हा नजर

टाकूनही नजरचुका होतात याची कल्पना आहे. काही राहूनही गेलं असणार. शिव्या आम्हालाच येत नाहीत. कुणाला त्या याव्यात असं वाटत नाही. स्वरावरून त्या कळतात. म्हणून त्या नाहीत. काही आवडलं नाही तर कृपया कळवा. प्लीज! आणि आवडलं तर..तर.. तेच आमचं यश!

**दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने**

प्रिय वाचक,

आम्हा दोघींच्या पहिल्यावहिल्या 'जॉइंट व्हेंचर'चं यश आश्चर्यचकित करणारं आहे. याचा फार आनंद वाटतोय. चुकीची दुरुस्ती वाचकांनी आमच्यापर्यंत पोहोचविली, याचा अर्थ त्यांनी पुस्तक व्यवस्थित आणि संपूर्ण वाचलंय असाच तर होतो. असंख्य रसिक वाचकांसाठी आम्ही दोघींनी पुस्तक पुन्हा पहिल्या पानापासून तपासलं. सगळ्या चुका दुरुस्त केल्या. कोल्हापूरची वारी करून श्री. देसाईंनी प्रुफ रिडींगला मदत केली. पुस्तक आणखी चांगल्या स्वरुपात सादर करण्यासाठी प्रयत्न करताना आम्हा दोघींना आनंदही झाला.

We enjoyed the whole experience

अल्पावधीत 'दुसरी आवृत्ती' या यशात आमचं लिखाण इतक्या चांगल्या पद्धतीनं, उत्कृष्ट मुखपृष्ठासहीत सादर करणाऱ्या ॐ पब्लिकेशन्स्चा सिंहाचा वाटा आहे. श्री. शितल मेहता, श्री. अनंत मनोहर, श्री. रावजी देसाई, आणि इंग्लिश बोलण्यासाठी उत्सुक असणारे वाचक यांचे ऋण आम्हाला भूषणावह आहे.

**आशा रुस्तम रतनजी** **लता अनिल कित्तूर**

## INDEX


1. Types of Sentences .............................................. 9

2. Construction of Sentences .................................. 45

3. Words often confused .......................................... 75

4. Use of pronouns .................................................. 99

5. Words used in many ways .................................. 131

6. Structures Part I .................................................. 156

7. Degrees of Comparison, Active & Passive voice . 170

8. Direct & Indirect Speech ..................................... 187

9. Auxiliary Verbs and Modals .................................. 197

10. Structures Part II ................................................. 228

11. Communication .................................................. 240

12. Idioms & Phrases & Proverbs ............................. 254

13. Festivals ............................................................. 272


✦✦✦

# Types of Sentences
## (वाक्याचे प्रकार)

आपलं म्हणणं दुसऱ्याला समजावं यासाठी शब्दांची अर्थयुक्त रचना करावी लागते. पूर्ण अर्थबोध होणाऱ्या शब्दसमूहाला वाक्य असे म्हणतात. ही अर्थपूर्ण रचना करण्यासाठी वाक्याचे प्रकार कोणते आहेत याची माहिती असावी लागते.

वाक्याचे चार प्रमुख प्रकार आहेत.

1) Assertive Sentence : विधानार्थी वाक्य.
   निश्चित विधान करणाऱ्या वाक्याला Assertive Sentence म्हणतात.
2) Interrogative Sentence : प्रश्नार्थक वाक्य.
   जे वाक्य प्रश्न विचारते त्या वाक्याला Interrogative Sentence म्हणतात.
3) Imperative Sentence: आज्ञार्थी वाक्य.
   जे वाक्य आज्ञा देते, विनंती करते, त्या वाक्याला Imperative Sentence म्हणतात.
4) Exclamatory Sentence : उद्‌गारवाचक वाक्य.

जे वाक्य उत्कट भावना वाक्य करते, त्या वाक्याला Exclamatory Sentence म्हणतात.

**(प्रमुख चार प्रकारांखेरीज आणखी दोन प्रकार आहेत.)**

1) Affirmative होकारार्थी – होकार व्यक्त करणारे वाक्य.

2) Negative नकारार्थी – नकार व्यक्त करणारे वाक्य.

वाक्याचे दोन प्रमुख भाग असतात.

* Subject : आपल्याला ज्याविषयी बोलायचे असते त्या Naming part ला Subject (उद्देश) म्हणतात. याला मराठीत कर्ता असे म्हणतात.

* Predicate : Subject विषयी काही सांगणाऱ्या भागाला Predicate म्हणतात. Telling Part म्हणजे Predicate (विधेय) म्हणतात.

बहुतेक वेळा Subject वाक्याच्या सुरुवातीला येते. क्वचित ते Predicate नंतर येते.

Imperative वाक्यात Subject गाळण्याचा प्रघात आहे. ते गृहीत धरलेले असते. 'Go out' या वाक्यात you हे Subject गृहीत धरलेले असते. वाक्य 'you go out' असे असते.

वाक्य तयार करताना कर्ता (Subject) कर्म (Object) आणि क्रियापद (Verb) यांचा वापर करावा लागतो. इंग्लिशमध्ये Subject च्या बरोबर Verb येते.

| | | | |
|---|---|---|---|
| I eat | You go | I meet | We play |
| They went | He goes | She does | It works. |

इंग्लिशमध्ये वाक्य तयार करण्याची पद्धत मराठीतील पद्धतीपेक्षा वेगळी असते. भाषांतर करताना अर्थानुसार करावे लागते. साधारणपणे वाक्यात जो भाग मराठीत आधी येतो तो इंग्लिश वाक्यात नंतर येतो आणि Vice Versa म्हणजे मराठीत जे नंतर असते ते इंग्लिशमध्ये आधी येते.

अगदी छोटे वाक्य पाहू, I eat a mango.

याचे मराठीत मी खाते एक आंबा असे होत नाही, ते,

'मी आंबा खाते' असे होते.

What bird is that upon the roof of our house? याचे मराठीत, 'आपल्या घरावर तो कोणता पक्षी आहे.' असे होते. 'कोणता पक्षी आहे तो वर आपल्या छपरावर घराच्या?' असे आपण मराठीत म्हणत नाही.

म्हणूनच शब्दाला शब्द असा विचारच मनात आणायचा नाही. अर्थ आणि शब्दांची जागा यालाच महत्त्व असते हे एकदा समजलं की वाक्य करणं आणि बोलणं– अर्थातच इंग्लिशमधून अगदी सोपं जातं.

वाक्यांचे जे प्रकार आहेत त्यापैकी प्रत्येकाची नीट माहिती असणे आवश्यक असते. वाक्य कसे तयार करावे याचा अभ्यास करावा लागतो.

**1) Assertive or Declarative Sentences : विधानार्थी वाक्य.**

ही वाक्ये निश्चित विधान करतात. यांना Declarative Sentences असेही म्हणतात. कशाबद्दल तरी काहीतरी सांगणे एवढाच यांचा हेतू. एखादे सामान्य अथवा वैज्ञानिक विधान ही वाक्ये करतात.

The Lion lives in the jungle

किंवा

The Earth revolves round the Sun. विधानार्थी वाक्ये होकारार्थी किंवा नकारार्थी असू शकतात. मात्र त्यात प्रश्नार्थक शब्द असतो. आज्ञा वा विनंती नसते. कोणतीही आकस्मिक भावना प्रकट केलेली नसते. म्हणजेच उद्‌गार असत नाही. दैनंदिन बोलण्यात अशा प्रकारची अनेक वाक्ये आपण वापरत असतो.

**Assertive Sentences:**

1. The Cow gives us milk.
   गाय आपल्याला दूध देते.
2. The boy went to bed at 9 o'clock.
   मुलगा ९ वाजता झोपायला गेला.
3. All of us will go for a movie tomorrow.
   आपण सगळे उद्या सिनेमाला जाऊ.
4. She is not feeling well.
   तिला बरं वाटत नाही.
5. The boys were very happy.
   सगळे मुलगे खूश होते.
6. It is very hot today.
   आज खूपच उकाडा आहे. (आज खूपच गरम होतंय)
7. Frogs croak in the rainy season.
   बेडूक पावसाळ्यात ओरडू लागतात.

8. They were not going to appear for the exam.
ते परीक्षेला बसणार नव्हते.
9. This man lives in U. S.
हा माणूस अमेरिकेत राहतो.
10. I like to see you in this dress.
तुला या पोषाखात पाहणे मला आवडते.
11. Old people come to this park every day.
वृद्ध माणसे रोज या बागेत येतात.
12. He is very busy.
तो खूपच कामात आहे.
13. He works for more than 14 hours daily.
तो रोज १४ तासांपेक्षा जास्त काम करतो.
14. The shop does not shut till 11 p. m.
रात्री ११ पर्यंत दुकानं बंद होत नाहीत.
15. We may go to Goa tomorrow.
आम्ही कदाचित उद्या गोव्याला जाऊ. (बहुतेक)
16. The child is able to ride a tricycle.
मुलगा तिचाकी चालवू शकतो.
17. He could go to the U. K. if he gets a scholarship.
स्कॉलरशिप मिळाली तर तो यू. के. ला जाईल.
18. I cycle to school everyday.
मी रोज सायकलवरून शाळेला जाते/जातो.
19. The Earth goes round the Sun.
पृथ्वी सूर्याभोवती भ्रमण करते.
20. We visited the exhibition yesterday.
आम्ही काल प्रदर्शनाला गेलो होतो. (आम्ही काल प्रदर्शन पाहिले)
21. The train was late.
गाडी लेट होती. (उशिरा आली) गाडी (म्हणजेच आगगाडी) उशिरा आली.

22. Everyone was happy to see him.
त्याला पाहून प्रत्येकाला आनंद झाला.
23. Birds live in trees.
पक्षी झाडावर राहतात.
24. The nightingale sings sweetly.
नाईंटिंगेल पक्षी गोड गातो.
25. Dogs bark.
कुत्रे भुंकतात.
26. This Sun rises in the East.
सूर्य पूर्वेला उगवतो.
27. The Ganges is the holiest river in India.
गंगा ही भारतातील पवित्र नदी आहे.
28. He will never cheat.
तो कधीच (कुणालाच) फसवणार नाही.
29. I shall not go to the fair.
मी मेळ्याला जाणार नाही.
30. Children love to eat sweets.
मुलांना चॉकलेट खायला आवडतात.
31. The fruit seller has not come today.
फळवाला आज आला नाही.
32. Everyone will go to see the movie.
प्रत्येकजण सिनेमा बघायला जाईल.
33. Madhuri Dixit still looks beautiful.
माधुरी दीक्षित अजूनही काय छान दिसते.
34. They did not find their car.
त्यांची गाडी त्यांना मिळाली नाही. (चोरीला गेलेली)
35. All the students are practising for the competition.
सर्व विद्यार्थी स्पर्धेसाठी तयारी करताहेत.